## मुंबई विद्यापीठ

क्र.वि.क./ ३६१ /२००९

अत्यंत महत्वाचे
हस्ते बटवडा

**परिपत्रक:**

सर्व प्राचार्य/संचालक, संलग्नीत अशासकीय अनुदानीत व विनाअनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, व्यवस्थापन व तत्सम महाविद्यालये (अल्पसंख्यांक महाविद्यालयासह) यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

दिनांक : १८ सप्टेंबर, २००९
स्थळ : मुंबई.

के. ई. पिल्ले
प्रभारी उपकुलसचिव

---

**तात्काळ**

क्र.संकीर्ण-२००९/(२७४/०९)/विशि-३

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मंबई - ४०० ०३२.
दिनांक : २४ जुलै, २००९.

प्रति,
कुलसचिव, मंबई विद्यापीठ, मुंबई.
कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मंबई.
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे.
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
कुलसचिव, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.
कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे.

विषय : मा. उच्च न्यायालय, दिल्ली यांना अपंग अधिनियम, १९९५ मधील कलम ४६ च्या अंमलबजावणीबाबत दिलेले आदेश.

महोदय,

उपरोक्त विषयांस अनुसरुन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या क्र.अपंग-२००८/प्र.क्र.१८४/सुधार-३, दिनांक २०-१०-२००८ च्या पत्राची प्रत या पत्रासोबत पाठविण्यात येत आहे. या प्रकरणी माहिती सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास तातडीने सादर करावयाचे असल्याने पत्रात नमूद केलेल्या कलम ४६ नूसार कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल उलट टपाली शासनास सादर करावी ही विनंती.

आपला,

सही/-
(प्र. गो. कानडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

...२/-

(सोबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे, "मा. उच्च न्यायालय, दिल्ली यांनी अपंग अधिनियम १९९५ मधील कलम ४६ च्या अंमलबजावणीबाबत दिलेले आदेश", याबाबतचे पत्र क्रमांक : अपंग २००८/प्र.क्र.१८४/सुधार-३, दिनांक २० ऑक्टोबर, २००८ ची प्रत व सहपत्रे)

महाराष्ट्र शासन

क्रमांक : अपंग २००८/प्र.क्र. २१५/आस्था-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १८ नोव्हेंबर, २००८

प्रति,

१. सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. सर्व संचालक,
३. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे,
४. कार्यालयीन सचिव, शिक्षण शुल्क समिती व प्रवेश नियंत्रण समिती, बांद्रा (पूर्व), मुंबई.
५. राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी (साशि ७), राष्ट्रीय सेवायोजना कक्ष, मुंबई.

यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

सदर आदेशांस अनुसरुन सार्वजनिक ठिकाणी अपंगाच्या सोयी सुविधांसाठी करावयाच्या तरतूदींची त्वरीत पूर्तता करण्यात येऊन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरेने पाठवावा. सदर न्यायालयीन आदेश आपल्या अधिपत्याखालील सर्व कार्यालये / संस्था यांनाही आवश्यक कार्यवाहीसाठी कळविण्यात येऊन सर्व समावेशक व एकत्रित अहवाल सादर करावा, ही विनंती.

सही/-
(प्र. ल. दराडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :
निवड नस्ती आस्था-२

... 3/—

# महाराष्ट्र शासन

क्रमांक : अपंग २००८/प्र.क्र.१८४/सुधार-३
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २० ऑक्टोबर, २००८.

प्रति,
अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय,
मंबई.

विषय : मा. उच्च न्यायालय, दिल्ली यांनी अपंग अधिनियम, १९९५ मधील कलम ४६ च्या अंमलबजावणीबाबत दिलेले आदेश.

उपरोक्त विषयांसदर्भात आपणांस कळविण्यात येते की, मा. उच्च न्यायालय, दिल्ली यांनी जावेद अबिदी विरुध्द युनियन ऑफ इंडिया व इतर या न्यायालयीन प्रकरणी अपंग अधिनियम १९९५ मधील कलम ४६ च्या अमंलबजावणीबाबत आदेश दिले आहेत. सदर कलम ४६ खालीलप्रमाणे आहे.

**46 – Non Discrimination in the built environment**
The appropriate Government and the local authorities shall, within the limits of their economic capacity and development, provide for-
[a] ramps in public buildings;
[b] adaptation of toilets for wheel chair users;
[c] Braille symbols and auditory signals in elevators or lifts;
[d] ramps in hospitals, primary health centers and other medical care and rehabilitation institution.

२) अपंग अधिनियम १९९५ मधील कलम ४६ हा अपंग व्यक्तींना सार्वजनिक ठिकाणी सुलभतेने वावरता यावे यासाठी द्यावयाच्या सोयी सुविधासंदर्भात आहे. त्यानुसार सदर तरतूदीची अंमलबजावणी करण्यासाठी या विभागामार्फत वारंवार कळविण्यात आलेले आहे. तथापि, मा. उच्च न्यायालय, दिल्ली यांच्या उपरोक्त आदेशानुसार याबाबत त्वरित निर्णय घेणे आवश्यक आहे.

३) तरी आपल्या विभागामार्फत सार्वजनिक ठिकाणी अपंगांच्या सोयी सुविधांसाठी करावयाच्या तरतूदीची त्वरित पूर्तता करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या विभागास पाठवावा, ही विनंती.

सही/-
(ज. न. राठोड)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत : उपरोक्त न्यायालयीन निर्णयाची प्रत

प्रत,
आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे